महाराष्ट्रातील मराठा जातीच्या राजकीय सहभागाचा चिकित्सक अभ्यास : विशेष संदर्भ सातारा जिल्हा

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाच्या मानव्यविद्या शाखेअंतर्गत राज्यशास्त्र विषयातील पीएच. डी. पदवीसाठीच्या शोध प्रबंधाचा सारांश आराखडा

संशोधक

प्रा. अशोक बाबुराव जाधव

राज्यशास्त्र विभाग,
शहाजीराजे महाविद्यालय,
खटाव, जि. सातारा (महाराष्ट्र)

मार्गदर्शक

प्राचार्य डॉ. पंजाब चव्हाण

दिगंबरराव बिंदू महाविद्यालय भोकर,
ता. भोकर जि. नांदेड

डिसेंबर 2017

महाराष्ट्रातील मराठा जातीच्या राजकीय सहभागाचा चिकित्सक अभ्यास : विशेष संदर्भ सातारा जिल्हा

प्रस्तावना :

मॅगेस्थेनिसच्या काळापासूनच भारतातील जातिव्यवस्थेच्या अभ्यासाला सुरुवात झाली आहे. मॅगेस्थेनिस भारतात पाचव्या शतकात आला होता. भारतातील जातिव्यवस्थेबाबत वर्णन त्याने इंडिका या ग्रंथात मांडले. मॅगेस्थेनिसच्या नंतर जातीचा पध्दतशीर अभ्यास व्यापारी, प्रवासी आणि सामाजिक विचारवंतानी केलेला आहे. जाती विषयावर अमेरिकेतील एका संस्थेने केलेल्या सर्वेक्षणात १९५१ पर्यंत ५००० जातीविषयक पुस्तकाचा उल्लेख केलेला आहे. यानंतर भारतातील जातिविषयक अध्ययनात बऱ्याच भारतीय व पाश्चिमात्य विचारवंतानी योगदान दिलेले आहे. अद्याप जातीवर भरपूर अध्ययने होत असले तरी अनुसूचित जाती जमातीच्या तुलनेने इतर जातीच्या सुक्ष्म संरचनेच्या अध्ययनाची न्यूनता जाणवते. म्हणून प्रस्तुत विषयाच्या संशोधनकरिता मराठा जातीची निवड करण्यात आली.

भारतातील जातिव्यवस्था ब्रिटिश आमदानीच्या काळापर्यंत म्हणजे जवळ जवळ १९ व्या शतकापर्यंत अभंग राहिली. संस्कृतीकरणातून म्हणजे वरच्या जातीतील ब्राम्हण आणि क्षत्रिय यांच्या चालीरिती, संस्कार आणि जीवनपध्दती यांचे अनुकरण करुन वरच्या जातींच्या स्तरावर जाणे आणि सत्ताधारी जातीच्या परस्पर संघर्षाचा फायदा घेऊन आणि राजकीय फायदे उपटून वरच्या श्रेणीत जाणे या मुख्यतः दोन मार्गानी जातिसंस्थेत परिवर्तन होत गेले. मुसलमान आणि ख्रिश्चन धर्मांनी सुमारे दहाव्या शतकापासून जातिसंस्थेवर आघात केले पण जातीची मुळ चौकट खिळखिळी करण्याचे कोणत्याही प्रकारचे सामर्थ्य या आघातांमध्ये नव्हते. ब्रिटीशांमुळे मात्र प्रथमच जातिसंस्थेला मूलभूत स्वरुपाचे हादरे बसले. व्यक्तिवाद, बुध्दिवाद, व्यक्तीस्वातंत्र्य ही मूल्ये आणि शहरीकरण आणि औद्योगिकरण या आर्थिक प्रक्रिया आणि नवे कायदे, सामाजिक सुधारणा आणि नवीन शिक्षणपध्दती ही साधने या सर्वांमुळे जातिसंस्थेच्या पायाभूत स्वरुपात हळूहळू

परिवर्तन होत गेले. स्वातंत्र्यानंतर तर अशी अपेक्षा होती की, जातीप्रधान विषम समाजरचनेकडून आपण एका किमान समाजरचनेकडे वाटचाल करु तथापि ही अपेक्षा साकार झालेली नाही, हे आज स्पष्ट झालेले आहे. विशेषतः ग्रामीण भारतातील जातीनिष्ठ आणि उच्चनीचतेवर आधारलेली सामाजिक सरचना अजूनही फारशी नष्ट झालेली नाही हे आता राजकीय नेते प्रज्ञावंत आणि समाजशास्त्रज्ञ सर्वच मान्य करीत आहेत. यामुळे जातीच्या संदर्भात असे म्हणावे लागेल की, जोपर्यंत मानवी समाजात सत्ता व संपत्तीचे महत्त्व तोपर्यंत जातीचे महत्त्व टिकून राहील. कोणाची इच्छा असो वा नसो. आज सुशिक्षित लोकांतही जातीचे महत्त्व वाढत आहे. हे लोक आपल्या जातीचे संघटन घडवून आणण्याचे नेतृत्व करत आहेत म्हणून ते जातीचे केंद्रबिंदू ठरत आहेत. अशा प्रकारे जातीचे महत्त्व वेगवेगळे स्वरुप धारण करीत आहे व समाजात आपले अस्तित्त्व टिकवून ठेवत आहे. अलिकडील काळात जातीच्या संशोधनात्मक ग्रंथाच्या माध्यमातून जातिसंस्थेत, धर्मव्यवस्थेत, अर्थव्यवस्थेत, राजकीय दर्जात व शैक्षणिक परिस्थिती इत्यादी सामाजिक जीवनातील सर्व पैलूंचा वेध घेण्याचा प्रयत्न झालेला दिसून येतो. त्याचप्रमाणे या परिवर्तनाला प्रामुख्याने औद्योगिकरण, नागरीकरण व तंत्रज्ञान इ. घटक जबाबदार ठरले आहेत.

स्वातंत्र्योत्तर काळामध्ये भारतात लोकशाही शासन व्यवस्थेचा स्विकार केलेला असल्यामुळे लोकप्रतिनिधी निवडून दिलेल्या लोकांच्याच मार्फत राज्यकारभार चालविला जात आहे. अलीकडच्या काळामध्ये राजकीय लाभ मिळविण्यासाठी जातीच्या राजकारणाला विशेष महत्त्व प्राप्त झाले आहे. ज्या जातीचे प्रतिनिधी राजकीय सत्तेत असतात त्या जातीला विविध योजनांचे झुकते माप मिळत असते. त्यात मराठा समाज देखील अपवाद नाही.

मराठा जात ही फार पूर्वीपासन शूर, धाडसी असून भारताच्या राजकारणात या जातीला विशेष महत्त्व आहे. तसेच संयुक्त महाराष्ट्राच्या निर्मितीनंतर या राज्यात मराठा जात राजकारणात प्रभावी राहीलेली आहे. याचाच एक भाग म्हणून मी **महाराष्ट्रातील**

मराठा जातीच्या राजकीय सहभागाचा चिकित्सक अभ्यास : विशेष संदर्भ सातारा जिल्हा या विषयावर संशोधन करण्याचे ठरविले आहे.

राजकीय सहभाग व कृती :

लोकशाही खऱ्या अर्थाने यशस्वी होण्यासाठी राजकारणामध्ये लोकांचा जास्तीत जास्त सहभाग आवश्यक असतो. राजकीय सहभाग म्हणजे लोकांनी स्वतः विविध कार्य, चळवळी निर्माण करणे गरजेचे आहे. यामधूनच समाजाची सत्ता कोणाकडे राहावी व शासनाने कोणत्या प्रकारची ध्येय आणि धोरणे स्विकारावीत याविषयीचा प्रत्यक्ष आणि अप्रत्यक्ष निर्णय म्हणजेच राजकीय सहभाग होय.

हटींग्टन आणि नेल्सन या विचारवंताच्या मते, राजकीय सहभाग म्हणजे, शासकीय निर्णयावर प्रभाव पाडण्यासाठी नागरीक करीत असलेल्या विविध कृती आहेत.

शासनाचे निर्णय हे जनतेच्या हितासाठी आणि सर्वांगिण विकासासाठी असले पाहिजेत अशी लोकांची भावना आणि इच्छा असते. म्हणून लोक शासनाच्या निर्णयप्रक्रियेवर प्रभाव पाडण्यासाठी दबावगटांची निर्मिती करणे, सदस्य होणे, लोकांना संघटीत करणे, शासनाला आपल्या मागण्या सादर करणे, आंदोलने, मोर्चा, चळवळी उभारणे तसेच त्यामध्ये सहभागी होणे इत्यादी कृती करतात. या सर्व कृतींचा समावेश राजकीय सहभागामध्ये केला जातो.

राजकीय सहभागाला प्रभावित करणारे घटक :

राजकीय सहभागाला प्रभावित करणारे घटकही महत्त्वाचे आहेत, याचे कारण असे की, त्यामुळेच व्यक्ती कमी अधिक प्रमाणात राजकारणात सहभागी होत असते. व्यक्तीच्या राजकीय सहभागाला प्रभावित करणाऱ्या वेगवेगळ्या घटकांची नोंद अभ्यासकांनी केली आहे.

रॉबट लेन यांनी वर्ग, जमातगट, भौगोलिक घटक, राजकीय पक्ष, आणि दुही गट हे राजकीय सहभागाला प्रभावित करणारे घटक म्हणून सांगितले आहेत.

लिस्टर मिलब्रॅथ यांनी चेतणेचे प्रमाण सामाजिक परिस्थिती, राजकीय व्यवस्थेचे स्वरुप, व्यक्तीगत गुण या घटकांव्यतिरिक्त सर्वसाधारण घटक म्हणून नोंद केली आहे.

सॅम्युअल लिपसेट यांनी व्यक्तीचे उत्पन्न, उत्पन्नाचे स्त्रोत, व्यवसाय, लिंग, वय, वर्ण, निवासाचे ठिकाण हे घटक व्यक्तीच्या राजकीय सहभागाला प्रभावित करतात असे म्हटले आहे.

भारतीय संदर्भात निर्मित, प्रासंगित स्वरुपाचा, असंघटित स्वरुपाचा राजकीय सहभाग मोठ्या प्रमाणात दिसून येतो. तसेच भारतीय संदर्भात राजकीय सहभागाबद्दल समृध्द ऐतिहासिक वारसा दिसून येत नाही.

याच अनुषंगाने महाराष्ट्रातील मराठा जातीच्या राजकीय सहभागाचा अभ्यास करण्याच्या उद्देशाने मी सातारा जिल्हा हा अभ्यासाचे कार्यक्षेत्र म्हणून निवड केलेली आहे.

देशात, महाराष्ट्रात आणि विशेषतः सातारा जिल्ह्यामध्ये मराठा समाजाला राजकारणामध्ये अधिक प्रतिनिधीत्व मिळूनही या समाजाचे शैक्षणिक, आर्थिक, सामाजिक मागासलेपण अधिक असल्यामुळे अलीकडील काळात इतर समाजाप्रमाणे मराठा समाजाला देखील आरक्षण मिळाले पाहिजे यासाठी मोठ्या प्रमाणात उठाव होत असून ही बाब खरी आहे. महाराष्ट्राच्या राजकारणात मराठा, ब्राम्हण व मागासवर्गीय जातींचा प्रभाव आहे. आतापर्यंत मराठा जातीकडे सातत्याने सत्ता राहिली, परंतू सत्ता केंद्रित झाली. सर्वसामान्य जातीतील लोकांचा खराच राजकीय सहभाग आहे का, सर्वसामान्य जनता जागृत आहे का, याची उत्सुकता वाटत होती. म्हणूनच मी मराठा समाजाच्या राजकीय स्थितीचा, त्यांच्या सामाजिक, शैक्षणिक आणि आर्थिक स्थितीचा अभ्यास करण्याच्या उद्देशाने या विषयाची संशोधनासाठी निवड केलेली आहे.

सातारा जिल्ह्यातील मराठा समाज आणि त्यांच्याबाबत कोणत्याही अंगाचे अद्याप अध्ययन झालेले नाही. म्हणून मराठा जातीच्या सामाजिक, आर्थिक, राजकीय स्थितीचा वेध घेण्याचा प्रयत्न प्रस्तुत संशोधनातून करण्यात आला आहे.

संशोधनाचे महत्त्व (Importance of Research) :

महाराष्ट्राच्या राजकारणात मराठा जातीची काय भुमिका आहे, मराठा जातीतील काही मोजकीच घराणी राजकारणात प्रभावी असून बहुसंख्य मराठा समाज आजही त्यांच्या आर्थिक, सामाजिक विवंचनेत अडकलेला आहे. त्यांची गरिबी, दारिद्रय, आर्थिक दुर्बलता यामुळे त्रस्त आहे. एकिकडे सामाजिक प्रतिष्ठा मराठा जातीला आहे, तर दुसरीकडे मराठा समाज आजच्या स्थितीत एका गंभीर संकटामध्ये सापडलेला आहे. याविषयीचे मुर्तीमंत उदाहरण पहावयाचे असतील तर आज संपुर्ण महाराष्ट्राच्या संपुर्ण भागामध्ये मराठा जातीचे आरक्षणासाठी निघत असलेले विशाल स्वरुपाचे मोर्चे. यामुळेच माझ्यासारख्या अभ्यासकाला असे वाटते की, महाराष्ट्र राज्याच्या स्थापनेपासून सत्तास्थानी सर्वाधिक मराठा जात आहे. सुरुवातीपासून या जातीचे मुख्यमंत्री अधिक झाले, मंत्री, राज्यमंत्री, आमदार, खासदार, पंचायत समिती, जिल्हा परिषदा बहुसंख्येने मराठी जातीच्याच हातात राहिलेल्या आहेत, तरी या समाजाचे दारिद्रय, बेकारी, गरीबी कायम असलेले दिसून येते.

या विविध प्रमुख बाबींचे गांभीर्य लक्षात घेता खरीच मराठा जात राजकीय दृष्ट्या प्रबळ असूनही या जातीतील बहुसंख्य मराठ्यांना याचा लाभ मिळालेला नसल्याची जाणीव मला झाल्यामुळे हा विषय मला अभ्यासण्यासाठी महत्त्वाचा वाटत आहे.

प्रस्तुत संशोधनातून समोर आलेल्या समस्येचे निदान करणे व उपाय सुचविणे.

सामाजिक संशोधन पध्दती :

प्रस्तुत संशोधनाकरिता सामाजिक संशोधन पध्दतीचा वापर पुढीलप्रमाणे करण्यात येणार आहे.

संशोधनाचे क्षेत्र (Area of Research) :

संशोधनाचा विषय ठरविल्यानंतर ते अध्ययन कोणत्या भौगोलिक क्षेत्राचे करायचे किंवा संशोधनाचे क्षेत्र कोणते असणार हे ठरविणे आवश्यक असते. त्याशिवाय अध्ययनविश्व निश्चित करता येत नाही. म्हणून महाराष्ट्रातील **सातारा जिल्ह्यातील**

जावळी, कराड, खंडाळा, खटाव, कोरेगांव, महाबळेश्वर, मान, पाटण, फलटण, सातारा आणि वाई या ११ तालुक्यातील ५५० उत्तरदात्यांची निवड सहेतुक नमुना निवड या प्रकारचा आधार घेऊन केली आहे.

संशोधनाची उद्दिष्ट्ये (Aims of Research) :

प्रस्तुत संशोधनासाठी खालील उद्दिष्ट्ये निश्चित करण्यात आलेली आहेत.

१) महाराष्ट्राच्या राजकारणावर मराठा जातीच्या प्रभावाचा अभ्यास करणे.

२) मराठा जातीचे राजकारणातील प्रमाण व तीवृतेचा अभ्यास करणे.

३) महाराष्ट्रामध्ये मराठा जात राजकारणात असूनही त्याचा बहुसंख्य मराठा जातीला काय लाभ मिळालेला आहे, याचा अभ्यास करणे.

४) मराठा जातीचा इतिहास अभ्यासणे.

५) मराठा जातीतील सामाजिक स्थितीचा अभ्यास करणे.

६) मराठा जातीतील शैक्षणिक स्थितीचा अभ्यास करणे.

७) मराठा जातीतील सांस्कृतिक स्थितीचा अभ्यास करणे.

८) मराठा जातीच्या आर्थिक परिस्थितीचे अध्ययन करणे.

९) मराठा जातीच्या राजकीय परिस्थितीचे अध्ययन करणे.

१०) मराठा समाजाच्या राजकीय सहभागामुळे या समाजाला कोणता लाभ मिळालेला आहे, याबाबतचा अभ्यास करणे.

संशोधनाची गृहितके (Hypothesis of Research) :

प्रस्तुत संशोधन विषयाच्या अनुषंगाने गृहितकांची मांडणी पुढीलप्रमाणे करण्यात आली आहे.

१) मराठा जातीत काही मोजक्याच घराण्याचा राजकारणावर प्रभाव राहिलेला आहे.

२) राजकीय सत्ता मराठा जातीकडे आहे, पण याचा लाभ बहुसंख्य मराठा जातीला झालेला नाही.

३) मराठा जातीला राजकीय इतिहास आहे.

४) महाराष्ट्राच्या राजकारणामध्ये मराठा जात प्रबळ आहे.

५) मराठा जातीत शैक्षणिक मागासलेपण आहे.

६) मराठा जातीत संयुक्त कुटूंबाचे प्रमाण अधिक आहे.

७) मराठा जात आर्थिकदृष्ट्या दुबळी आहे.

८) मराठा जातीचा राजकीय सहभाग जास्त आहे.

९) मराठा जातीचा विविध राजकीय पक्षातील सहभाग जास्त आहे.

१०) मराठा जातीला राजकारणात अधिक प्रतिनिधीत्व मिळूनही त्यांचे मागासलेपण कायम आहे.

संशोधन आराखडा (Research Design) :

प्रस्तुत संशोधनासाठी अन्वेषणात्मक संशोधनात्मक आराखडा आखण्यात आला. तसेच समस्येचे निदान करण्यासाठी आराखड्याचे स्वरुप अंशतः निदानात्मक संशोधन आराखड्याचेही ठेवण्यात आले.

नमुना निवड :

सातारा जिल्ह्यातील सातारासहित प्रत्येक तालुक्यातून ५० या प्रमाणे ११ तालुक्यातून ५५० उत्तरदात्याची निवड गैरसंभाव्य नमुना निवड प्रकारातील सहेतुक नमुना निवड पध्दतीने करण्यात येणार आहे.

तथ्य संकलन (Data Collection) :

तथ्य संकलनाचे प्रामुख्याने दोन प्रकार आहेत. प्राथमिक स्त्रोतातील मुलाखत अनुसूची तंत्राचा वापर करुन मिळालेल्या माहितीच्या सत्यतेची पडताळणीकरिता व इतर घटकांच्या माहितीकरिता निरिक्षण तंत्राचा वापर करण्यात येईल. व्दितीयक स्त्रोतातील दैनिक वृत्तपत्रे, साप्ताहिक, पाक्षिक, मासिके, व्दिमासिके, वार्षिक अंक, प्रकाशित, अप्रकाशित साहित्य, संदर्भ ग्रंथ, विशेषांक, स्मरणिका, विश्वसनीय कागदपत्रे, इंटरनेट, नकाशे व फोटो यासारख्या व्दितीयक आधुनिक स्त्रोताचा वापर प्रस्तुत संशोधनाच्या तथ्य संकलनाकरिता करण्यात येणार आहे.

मुलाखतपूर्व अनुसूची चाचणी :

मुलाखत अनुसूचीमध्ये अपूर्ण तसेच अनावश्यक प्रश्न राहू नये, आवश्यक प्रश्न गाळले जाऊ नये म्हणून उत्तरदात्यांकडून अनुसूचीच्या सहाय्याने पूर्वचाचणी घेऊन योग्य व आवश्यक स्वरुपाच्या माहितीचे संकलन करण्यात येऊन, प्रस्तुत विषयाच्या संशोधनाकरिता तयार करण्यात आलेल्या अनुसूचित बंदिस्त प्रश्नाचा समावेश करण्यात येणार आहे.

संशोधनाची व्याप्ती (Scope of Research) :

प्रस्तुत विषयाच्या अनुषंगाने संशोधन विषयाच्या व्याप्तीसंबंधीचे पैलू पुढीलप्रमाणे विशन केले आहेत.

१) सातारा जिल्ह्यातील मराठा जातीचा अभ्यास करताना सामाजिक, आर्थिक व राजकीय यासारख्या घटकांचे अध्ययन करण्यात आले आहे. यात कौटूंबिक, वैवाहिक, जात, विवाह, हुंडा, घटस्फोट, पारंपारिक व्यवसाय, शेती, नवीन व्यवसाय, आरक्षण, बचत व कर्ज इत्यादी सामाजिक व आर्थिक घटकांशी संबंधित पैलूंचे अध्ययन करण्यात येणार आहे.

२) मराठा जातीच्या धार्मिक व सांस्कृतिक जीवनाचे अध्ययन करण्यात येणार आहे.

३) मराठा जातीच्या शैक्षणिक स्थितीच्या अभ्यासात कुटूंबातील सदस्याचे शिक्षण, शाळेत जाणारी मुले, कुटूंबातील मुला-मुलींची संख्या, वर्ग शिक्षणाचे माध्यम, शैक्षणिक सोयी-सुविधा, शाळा सोडण्याचे कारणे इ. घटकाचे अध्ययन करण्यात येणार आहे.

४) मराठा जातीतील स्त्री दर्जाचे बदलते स्वरुप अभ्यासताना त्यांच्या कुटूंबातील गरजा, स्त्रियांचा निर्णय प्रक्रियेतील सहभाग, आर्थिक अधिकार, वैवाहिक दर्जा, धार्मिक स्थान इ. घटकांचे अध्ययन करण्यात येणार आहे.

५) मराठा जातीच्या राजकीय स्थितीचे अध्ययन करताना राजकीय पक्षाचे सदस्यत्व, विविध आंदोलनातील सहभाग इत्यादींचे अध्ययन करण्यात येणार आहे.

संशोधनाची मर्यादा (Limitations of Research) :

१) प्रस्तुत संशोधनात १९८१ नंतर जातीवर आधारित जनगणना झालेली नसल्यामुळे सातारा जिल्ह्यातील व तालुक्यातील कोणत्या गावात किती मराठा जातीचे लोक राहतात याची विश्वसनीय माहिती उपलब्ध नाही, ही या संशोधनाची मर्यादा आहे.

२) ५५० कुटूंबाची माहिती कुटूंब प्रमुखाव्दारे मिळविलेली आहे. त्यामुळे प्रस्तुत संशोधनाला स्वतःच्याच काही मर्यादा आहेत.

३) प्रस्तुत संशोधनात मराठा जातीचा सामाजिक, आर्थिक व राजकीय स्थितीचा अभ्यास करण्यासाठी सामाजिक, आर्थिक, धार्मिक, सांस्कृतिक, शैक्षणिक व स्त्री दर्जाचे स्वरुप इत्यादी सामाजिक जीवनातील महत्त्वाच्या घटकांचा समावेश केला जाणार आहे.

४) प्रस्तुत संशोधनात मराठा जातीचे अध्ययन करण्यात येणार आहे. प्रस्तुत संशोधनातील धार्मिक व सांस्कृतिक जीवनातून निघालेले निष्कर्ष फक्त या जातीला लागू होतील.

आशय विश्लेषण (Content Analysis) :

प्रस्तुत विषयाच्या अनुषंगाने आशय विश्लेषण तंत्राची निवड तथ्यांच्या विश्लेषणाकरिता करण्यात येणार आहे.

साहित्य सर्वेक्षणाचा आढावा :

प्रस्तुत विषयाच्या संशोधनाकरिता साहित्य सर्वेक्षणाबरोबरच अनुभवाचेही सर्वेक्षण करुन अध्ययनात विविध जाती, जमातींचा व संशोधन विषयाच्या अनुषंगाने झालेला संशोधनात्मक प्रकाशित व अप्रकाशित साहित्याचे सर्वेक्षण पुढीलप्रमाणे केले जाणार आहे.

विनायक मोरे यांनी जातीच्या प्रतिमानाला स्पष्ट करताना हिंदू, तेली व लिंगायत तेली यांच्यातील सामाजिक, धार्मिक जीवनातील भेद स्पष्ट केली आहे. परंतू त्यांच्या आर्थिक जीवनात समानता आहे. सुशिक्षित तरुण नेतृत्व आपल्या जातीचे संघटन करत आहेत.

नाकीया अख्तार अली यांनी व्यावसायिक गतिशिलतेमुळे व्यक्तीचा दर्जा जन्म व संपत्तीवर अवलंबुन राहिला नाही तर शिक्षण व व्यवसायावर अवलंबून आहे. जात व व्यवसाय यातील संबंध पूर्वीसारखे राहिले नाहीत ते दोन्ही घटक वेगवेगळे झाले आहेत.

The changing frontiers of caste (१९६७) या ग्रंथात योगेश अट्टल यांनी उत्तर प्रदेशातील तेली लोकांनी बदलत्या परिस्थितीचा परिणाम म्हणून कुंभार व्यवसायाचा स्वीकार केल्यामुळे त्यांना कुंभार व तेली म्हटले जाऊ लागले.

एन. के. बोस यांच्या ओरिसा व बिहार राज्याच्या जमातीच्या अभ्यासात विविध प्रकारच्या तेली जाती आढळून आल्या. त्यांच्यात बेटी व्यवहार होत नाहीत.

उत्तर प्रदेशातील कुंभार जातीवर तंत्रझानामुळे झालेल्या व्यावसायिक गतिशिलतेच्या संदर्भात गीता सोधी यांनी असे निष्कर्ष मांडले की, कुंभारांनी आर्थिक अस्थिरतेमुळे तांत्रिक बदलांचा स्वीकार केल्यामुळे त्यांच्या पारंपारिक जीवनात बदल घडून येऊ लागला.

संजय लाखेपाटील यांच्या जालना जिल्ह्यातील तेली जातीच्या अध्ययनात असे निष्कर्ष मांडतात की, व्यावसायिक गतिशिलतेमुळे आर्थिक सुधारणा होत आहे. शिक्षणाचे प्रमाण कमी आहे. कर्ज घेण्याचे प्रमाण आहे. व्यवसायाच्या आधारे श्रेष्ठ-कनिष्ठ असा भेद पाळला जात नाही.

अशा प्रकारे संशोधन विषयाच्या अनुषंगाने संबंधित साहित्याचे सर्वेक्षण करुन आपल्या संशोधनात योग्य त्याठिकाणी त्याचा उपयोग करुन त्या संदर्भात आपल्या संशोधनाचे निष्कर्ष मांडले जातील.

उपयुक्त संकल्पना :

प्रस्तुत संशोधनाच्या अनुषंगाने जातीची व्याख्या सामाजिक दर्जा, सामाजिक संस्था, सामाजिक स्तरीकरण, सामाजिक परिवर्तन, मराठा जात वर्णव्यवस्था, स्थलांतर, आधुनिकीकरण इत्यादी संकल्पनांचे स्पष्टीकरण करण्यात आलेले आहे.

सैध्दांतिक दृष्टिकोन :

प्रस्तुत संशोधनाकरिता मराठा जातीच्या सामाजिक, राजकीय, आर्थिक परिस्थितीचा अभ्यास करण्यासाठी कार्यात्मक दृष्टीकोनाचा अवलंब करण्यात येणार आहे.

संशोधनाचा कालावधी :

प्रस्तुत संशोधन विषयाच्या अनुषंगाने संशोधनाचा कालखंड इ.स. जानेवारी २००० ते डिसेंबर २०१५ आहे. या कालावधीतील मराठा जातीच्या सामाजिक, राजकीय, आर्थिक परिस्थितीचा अभ्यास करण्यसाठी ५५० अनुसुची भरुन घेतल्या जातील.

संशोधन अहवाल लेखन (Research of Report Writing) :

प्रस्तुत विषयाचे संशोधन अहवाल लेखन प्रकरणांचा रचनेनुसार पुढीलप्रमाणे मांडण्यात येणार आहे.

प्रकरणनिहाय रचना :

संबंधीत संशोधनाचे कार्य हे पुढील सात प्रकरणाच्या सहाय्याने पूर्ण करण्यात येणार आहे.

प्रकरण पहिले

विषय प्रवेश आणि संशोधन पध्दती :

भारतीय समाजव्यवस्थेची ओळख, वर्णव्यवस्थेतुन जातिव्यवस्थेचा उगम, भारतीय स्तरीकरणाचे स्वरूप, जाती उत्पत्तीचे सिध्दांत संशोधन विषयाच्या अनुषंगाने प्रस्तावना करून जातीची उत्पत्ती अभ्यासली जाऊन त्यानंतर मराठा जातीचा विचार केला जाणार आहे. मराठा पुर्वी कोण होते, त्यांचा इतिहास काय आहे, देशाच्या आणि महाराष्ट्राच्या एकुणच राजकारणात मराठा जातीचा सहभाग कशा प्रकारचा आहे, याबाबत अध्ययन केले जाणार असुन स्वातंत्र्योत्तर काळातील सातारा जिल्ह्यातील मराठा जातीचे सामाजिक व आर्थिक, राजकीय जीवन इत्यादी तथ्यांचे संकलन व्दितीयक स्त्रोतांच्या व अनुभव सर्वेक्षणाच्या माध्यमातुन करण्यात येणार आहे.

प्रकरण दुसरे

संदर्भ साहित्याचा संक्षिप्त आढावा :

प्रस्तुत प्रकरणात विविध जातीच्या संदर्भात आजपर्यंत ज्या अभ्यासक, संशोधक यांनी लिखाण केलेले आहे, जे संशोधन केले आहे, त्यांचे आपल्या जातीबाबत, समाजाबाबत काय म्हणने आहे, तसेच मराठा जातीच्या संदर्भात जे साहित्य उपलब्ध आहेत, जे लिखाण उपलब्ध आहे, याविषयीचा थोडक्यात आढावा घेण्यात येईल.

प्रकरण तिसरे

सातारा जिल्ह्याची संक्षिप्त माहीती :

संबंधीत संशोधन हे सातारा जिल्ह्याच्या विशेष संदर्भात असल्यामुळे या जिल्ह्याची निर्मिती, जिल्ह्याची ऐतिहासिक ओळख, प्रशासकीय व्यवस्था, प्राकृतिक रचना, विभाग, नदया, हवामान व पर्जन्यमान, जमीन, पिक रचना, पशुधन, विजेचा वापर उद्योग, वाहतूक व दळणवळण, रोजगार, सहकार, शाळा व महाविद्यालय, नगरपरिषदा, पंचायत समित्या, जिल्ह्याची लोकसंख्या, जिल्ह्यातील विविध सामाजिक, आर्थिक घडामोडी, शैक्षणिक स्थिती, कृषीविषयक स्थिती, जिल्ह्यातील जलसिंचन, बँका याबाबतचा थोडक्यात आढावा घेतला जाणार आहे.

प्रकरण चौथे

मराठा जातीच्या राजकीय सहभागाचा अभ्यास :

प्रस्तुत प्रकरणात मराठा लोकांच्या सामाजिक, धार्मिक, सांस्कृतिक व शैक्षणिक जीवनावर आधारीत प्रश्न विचारण्यात येऊन, मराठा लोकांच्या आर्थिक जीवनावर प्रश्न विचारण्यात येऊन मराठा लोकांच्या राजकीय जीवनावर आधारीत प्रश्न विचारण्यात येऊन प्राप्त तथ्यांच्या विश्लेषणातून आवश्यक त्या ठिकाणी सारण्या व आलेख तयार करण्यात येऊन तथ्यांचे विश्लेषण करुन विश्लेषणाअंती निघालेल्या निधानांची मांडणी करण्यात येणार आहे.

प्राप्त तथ्यांच्या विश्लेषणातून आवश्यक त्या ठिकाणी सारण्या व आलेख तयार करण्यात येऊन तथ्यांचे विश्लेषण करुन विश्लेषणअंती निघालेल्या विधानांची मांडणी करण्यात येणार आहे.

प्रकरण पाचवे

निष्कर्ष व शिफारशी :

संशोधनासाठी निवडलेला विषय हा महाराष्ट्रातील मराठा समाजाचा राजकीय सहभाग : विशेष संदर्भ सातारा जिल्हा असून संशोधन पूर्ण केल्यानंतर यासाठी जी उद्दिष्टे समोर ठेवण्यात आलेली होती, जी गृहित परिस्थिती लक्षात घेतली होती, या अनुषंगाने जे निष्कर्ष समोर येतील त्याबाबतची या ठिकाणी मांडणी करुन यामध्ये ज्या उणिवा किंवा काही त्रुटी असतील तर त्याबाबतच्या शिफारशींची मांडणी या ठिकाणी करण्यात येणार आहे.

संदर्भ ग्रंथ सुची :

१) पटवर्धन मो.वि., वर्ण व जाती, प्रकाशक - विदर्भ मराठावाडा बुक कंपनी, पुणे, प्रथमावृत्ती १९६६, पृष्ठ क्रमांक १७.

२) पुंडलिक विद्याधर गंगाधर, आर्थिक विकासाच्या सामाजिक बाजु, प्रकाशक – कॉन्टीनेंटल, पुणे, प्रथमावृत्ती १९७९, पृष्ठ क्रमांक १११.

३) आगलावे प्रदीप, संशोधन पध्दतीशास्त्र व तंत्रे, प्रकाशन विद्या, नागपूर, २००० पृष्ठ क्रमांक ११९, १२०.

४) कुंभोजकर ग.वि. संशोधन पध्दती व शास्त्र, फडके प्रकाशन, कोल्हापूर, १९८९.

५) अग्रवाल शिवशंकर सामाजिक अनुसंधान सर्वेक्षण एवं सांख्यिकी, रितू प्रकाशन, जयपूर, प्रथमावृत्ती २०११.

६) कऱ्हाडे बी.एम., सामाजिक संशोधन पध्दती, प्रकाशक - पिंपळापुरे अँड कंपनी पब्लिशर्स, नागपूर, प्रथमावृत्ती जून २००९, पृष्ठ क्रमांक १४३.

७) लाखेपाटील संजय - तेली जात वर्तमान परिस्थिती आणि भविष्य २००७. (डॉ.बा.आं.म. विद्यापीठ, औरंगाबाद अप्रकाशित शोधप्रबंध) २१२, २१५, २५१, २६२, २९५, २९९, १२६.
८) अत्रे त्रिं.ना. गावगाडा, संपादकीय आवृत्ती, २०११.
९) कुलकर्णी पी.के., भारतातील धर्म, विद्याभारती प्रकाशन, लातूर ६ मे १९९८.
१०) चन्द्र सोती शिवेन्द्र भारत में सामाजिक समस्या, कनिष्ठ प्रकाशन, नई दिल्ली, प्रथम संस्करण २००२.
११) मिश्रा रतनलाल भारतीय संस्कृती, सुरभी प्रकाशन, जयपूर, १९९८.
१२) लवानिया एम.एम., जैन के. शशी धर्म का समाजशास्त्र, रिसर्च त्रिपोलिया प्रकाशन, जयपूर, २०११.
१३) जिल्हा आर्थिक व सामाजिक समालोचन, सातारा जिल्हा, २०१२-१४.
१४) Ahuja Ram Research Methodology, Rawat Publication, Jaipur, Reprint 2005.
१५) Dutta N.K. Growth of Caste in India, Firma K.L. Mukhopadhya Publication, Culcutta; 1968 Edition - 2, 1968.
१६) Gazette of India Dist. Satara, Pub. Maharashtra State, Edition – Ist.
१७) Ghugare Suryakant Veershaivism in Maharashtra : A Sociological Analysis with special reference to Kolhapur District-1989, Shivaji University, Kolhapur.

मार्गदर्शक

प्राचार्य डॉ. पंजाब चव्हाण
दिगंबरराव बिंदू महाविद्यालय भोकर
ता. भोकर जि. नांदेड

संशोधक

प्रा. अशोक बाबुराव जाधव
राज्यशास्त्र विभाग,
शहाजीराजे महाविद्यालय
खटाव, जि. सातारा (महाराष्ट्र)